**(बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १५व्या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा सौ. माधुरी जोशी यांनी केलेले भाषण - शिकागो, २२ जुलै २०११)**

पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, प्रतिभाशाली साहित्यिक श्री. रत्नाकर मतकरी आणि सभागृहातील सर्व उपस्थितांना माझे नमस्कार आणि हार्दिक स्वागत.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १५ व्या अधिवेशनाला आज आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहिलात याचा मला मनापासून आनंद होत आहे. मराठी संस्कृतीवरील प्रेमामुळे आपण येथे जमलो आहोत आणि इथल्या अभिरुची संपन्न कार्यक्रमांना आपल्यातील रसिकता दाद देईल असा विश्वास वाटतो. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यात मदत करणारे स्वयंसेवक, हितचिंतक, अधिवेशनाचे नियोजक श्री. नितीन जोशी व त्यांचे सहकारी, सर्व देणगीदार आणि जाहिरातदार यांची मी अत्यंत आभारी आहे. आज इथे उपस्थित असलेली प्रत्येक मराठी व्यक्ती ज्ञानसंपन्न, गुण संपन्न आणि कर्तृत्ववान आहे. आपल्या यशाच्या भरारीत पंखांना जी ताकद मिळाली ती आपल्या संस्कृतीने, मायबोलीने आणि मायदेशाने दिली आहे. मराठी संस्कृती ही आपला आधार आहे, साहित्य आणि कलानिर्मितीचे साधन आहे, प्रगतीची शिडी आहे आणि मानसिक स्थैर्याचे कारण आहे. आज सुरु होणाऱ्या अधिवेशनामुळे सर्वांच्या मनामध्ये आपण ज्या संस्कारांमध्ये वाढलो त्या संस्कारांचे पुनरुज्जीवन होणार आहे. त्यातूनच पुढील आव्हानांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य मिळणार आहे. सुप्रसिद्ध कवी श्री. जयंतकुमार त्रिभुवन यांनी म्हटले आहे की

"अंधाराचे दिवस येताहेत, दिवा दिवा जमवायला हवा
वेळ पडली तर सूर्य देखील, पणतीत आणून लावायला हवा"

यांच्या मुळच्या कवितेत एक छोटासा बदल करून म्हणावेसे वाटते की,

"आव्हानाचे दिवस येताहेत, दिवा दिवा जमवायला हवा"
संस्कृतीचा सूर्य देखील, पणतीत आणून लावायला हवा"

आपल्या भारतीय संस्कृतीशी आपलं नात रक्ताच आहे. हे नात इतकं जवळच आहे की भारतापासून कितीही दूर राहिल तरी संस्कृती बरोबरचा संबंध संपत नाही. पाश्चिमात्य देशातील वास्तव्या मध्ये मनातले भारतीयत्व आणि मराठी अस्मिता लपून राहत नाही. येथील गतिमान जीवनामध्ये जेव्हा चार फुरसतीचे क्षण वाट्याला येतात तेव्हा आपली भाषा बोलनार्यांबरोबर संवाद साधला जातो. या संवादातून मराठी मंडळ उभे राहते, आणि या मंडळाच्या द्वारे आपण आपल्या संस्कृतीशी आणि भारतीय जीवन मूल्यांशी जोडले जातो. संस्कृतीच्या लाटेत अभिव्यक्तीचे अनेक प्रवाह सामील होतात. भारतीय संगीत, भाषा, अभिनय आणि इतर अनेक कला (आणि त्यातील सर्वात महत्वाची कला म्हणजे पाक कला) प्रकट करण्यासाठी एक दृष्टीकोन मंडळातर्फे कार्यरत होतो. अशा सर्व मंडळांना एकत्र आणण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाची उभारणी होते. या इवल्याशा रोपाला धुमारे फुटतात आणि अशी बहारदार

अधिवेशने उभी राहतात.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना ही उत्तर अमेरिकेत सर्वत्र विखुरलेल्या मराठी मंडळांना एक सामायिक मंच मिळावा या उद्देशाने १९८१ साली झाली. मराठी समाजामध्ये एकी निर्माण करणे व सीमित परिघातून लोकांना बाहेर काढून एका विशाल प्रांगणात आणण्याचे काम बृहन्महाराष्ट्र मंडळाने आजतागायत सतत केले आहे. मराठी शाळा, दर्जेदार मराठी चित्रपट दर्शन, सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी एकांकिका स्पर्धा, स्वरांगण, भारतातील कलाकारांचे उत्तर अमेरिकेत कार्यक्रम अशा अनेक उपक्रमांद्वारे बृहन्महाराष्ट्र मंडळ आपल्या स्थानिक मंडळाबरोबर सतत काम करत असते. आज मला सांगायला अतिशय आनंद व अभिमान वाटतो की, इतिहासात प्रथमच उत्तर अमेरिकेतील बहुतांशी म्हणजे ४७ मंडळे आज बृहन्महाराष्ट्र मंडळाची सदस्य झाली आहेत. इंटरनेट व इतर माध्यमातून मंडळांशी आणि त्यामुळे सर्व मराठी समाजाशी आम्ही संवाद साधला आहे. नकारात्मक भूमिका जर मनात असेल तर सकारात्मक कार्य हाताने कधीच होणार नाही या भावनेने व एकजुटीने बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी आणि सल्लागार यांनी काम केले. भारतातून आज इथे आलेल्या अतिथींना माझा असा नम्र निरोप आहे की "मराठी संस्कृती व मराठी भाषा जोपासण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे आणि त्याबद्दल काळजी नसावी ही विनंती."

आज या मंगल सोहळ्याच्या दिवशी मनात श्रद्धा आहे, भक्ती आहे, अभिमान आहे आणि संकल्प आहे. संत श्री ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचे तर

"दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो, जो जे वांछील तो ते लाहो, प्राणी जात"

माउलींनी परमेश्वराकडे जे मागणे मागितले आहे त्याच विचाराचा आधार घेऊन म्हणावेसे वाटते की मराठी संस्कृती विश्वात सर्वत्र निरंतर राहावी, तिच्यामुळे आपण सर्वांना चैतन्य, आनंद आणि स्फूर्ती मिळावी. त्याचप्रमाणे इथे जन्मलेल्या आणि वाढलेल्या तरुण पिढीने आपल्या संस्कृतीतून प्रेरणा घ्यावी, त्या प्रेरणेतून चांगले कार्य घडावे अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करते आणि आपली रजा घेते.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय अमेरिका, जय जगत

धन्यवाद